AvianMedia

Punya Nagari
Thursday, August 27th, 2009 (Mumbai)
Page No- 10

# कसोटी सामन्यांच्या संख्येत वाढ हवी

## हरभजन सिंगची सूचना

मुंबई, दि. २६ - कसोटी क्रिकेट जिवंत ठेवण्यासाठी सामन्यांच्या संख्येत वाढ करणे हाच उत्तम मार्ग आहे, असे भारताचा फिरकी गोलंदाज हरभजन सिंगचे मत आहे.

एका प्रायोजित कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या हरभजन सिंगने इंग्लंड-ऑस्ट्रेलियामधील ॲशेस मालिकेचे उदाहरण देताना सांगितले की, या मालिकेतील पाच कसोटी सामन्यांच्या वेळी प्रेक्षकांची उपस्थिती अफाट होती. यावरून सिद्ध होते की, कसोटी क्रिकेटची लोकप्रियता अद्याप ओसरलेली नाही; परंतु त्याच्या मते आशिया खंडात आणि भारतात कसोटी सामन्यांत प्रेक्षकांची संख्या समाधानकारक नसते. नागपूर येथील भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्याला फारच थोडे प्रेक्षक उपस्थित होते, याबद्दल त्याने खंत व्यक्त केली. कसोटी क्रिकेट लोकप्रिय करण्यासाठी त्याचे मार्केटिंग मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे, असे त्याला वाटते. सचिन तेंडुलकरने सुचवल्याप्रमाणे कसोटी सामना पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क न आकारता स्टेडियममध्ये येऊ देण्याचा उपक्रम सुरू करावा, असे हरभजन सिंगलाही वाटते. सचिन तेंडुलकर जेव्हा मुंबईतर्फे रणजी सामन्यात खेळत असतो तेव्हा वीस-पंचवीस हजार क्रिकेटशौकीन उपस्थित असतात. मग त्याच धर्तीवर कसोटी सामन्यांकडेही प्रेक्षकांना आकर्षित करता येईल.

